विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणे बाबत.
(श्री.इसारवाडे मल्हारी पुंजाबा वि.अ.(ग्रांप) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पंचायत समिती पाथर्डी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश- ग्रामपंचायत विभाग/ग्रांप३/ई क्र. १०००८८
दिनांक ०१/०४/२०२५

संदर्भ :-१. कार्यालयाचे दोषारोप /ग्रांप३/२७८/ २०२४ दिनांक ११/१०/२०२४ (सेवा निलंबन आदेश)

२.कार्यालयाचे दोषारोप ज्ञापन साप्रवि२/ग्रांप३/२७९/२०२४ अ.नगर दिनांक ११/१०/२०२४

३.सह. आयुक्त (रोहयो)नाशिक विभाग नाशिक यांचे पत्र दिनांक २७/०१/२०२५

४.उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक मग्रारोहयो जि.प.अ.अनगर यांचे पत्र कार्यासन -३ /५१/२०१५ अ.नगर दिनांक १७/०२/२०२५

५. श्री.इसारवाडे मल्हारी पुंजाबा वि.अ.ग्रांप यांचा खुलासा दिनांक २२/१०/२०२४

६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

ज्या अर्थी श्री.इसारवाडे मल्हारी पुंजाबा वि.अ.(ग्रांप) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पंचायत समिती पाथर्डी. यांचे गैरवर्तन विरुध्द संदर्भ क्रमांक ०२ अन्वये त्यांना ०४ दोषारोप ठेवून ज्ञापन देण्यात आलेले आहे . संदर्भ क्रमांक ०५ नुसार श्री. इसारवाडे मल्हारी पुंजाबा यांनी दोषारोपांचा खुलासा सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले सर्व एकूण ०४ आरोप अमान्य केलेले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार श्री. इसारवाडे मल्हारी पुंजाबा यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने संदर्भ क्र.०६ मधे नमुद केलेनुसार चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्याचे अधिकार प्रदान आहेत.

त्या अर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर उक्त नियमांच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री.इसारवाडे मल्हारी पुंजाबा विस्तार अधिकारी (ग्रांमपंचायत) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पंचायत समिती पाथर्डी यांचेवर ठेवण्यात आलेल्या उक्त गैरवर्तनाच्या दोषारोपाच्या संदर्भात विभागीय चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची विभागीय चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहा. आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच सदर विभागीय चौकशीस

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील. प्रकरणी नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी यांनी संदर्भ क्रमांक ०६ मधील सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०४०१०६००३७ असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 01-04-2025 15:50:41

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

सहा. आयुक्त, (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक

२/- सोबत दोपारोप ज्ञापन या समवेत जोडले आहे. प्रकरणी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- श्री.इसारवाडे मल्हारी पुंजाबा सेवानिलंबीत वि.अ.(ग्रांप) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पंचायत समिती पाथर्डी.

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर /पाथर्डी

२/- सोबतचा आदेश श्री.इसारवाडे मल्हारी पुंजाबा सेवानिलंबीत वि.अ.(ग्रांप) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पंचायत समिती पाथर्डी. यांना बजावून तो मिळालेबाबतची पोहोच या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- श्री. विजय गणपत चौसाळकर कक्ष अधिकारी पंचायत समिती पाथर्डी सादरकर्ता
व्दारा- कार्यालय प्रमुख